**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २४/२०१६-१७/१८९ दिनांक: १६-११-२०१६

**आदेश**

**आदेश केस क्र. २४/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. व्यंकट बाबू कांबळे :<br>२२/१३५८ गणेशनगर शहापूर इचलकरंजी<br>ता. हातकणंगले, जिल्हा. कोल्हापूर | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इचलकरंजी | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग इचलकरंजी ब | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय जाहीर करीत आहे.

१) तक्रारदार श्री व्यंकट बाबू कांबळे हे घरगुती वीज ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्र. २५०६५२०५२०९२ असा आहे. ते शहापूर, इचलकरंजी येथे रहातात. त्यांना दिनांक २२-०४-२०१६ रोजी रु. ९२००/- चे, दि. २३-०५-२०१६ रोजी रु. ९,३५३/- चे आणि दि. २२-०६-२०१६ रोजी रु. ४,०८४/- चे अशी दिलेली वीज देयके मान्य नाहीत. सदर वीज देयके दुरुस्त करुन सरासरी वीज वापराच्या आधारावर त्यांना सुधारीत देयके द्यावीत असे त्यांचे म्हणणे आहे.

२) वितरण कंपनी यांच्या लेखी निवेदना प्रमाणे , जे वीज मिटर सदोष होते. असे तक्रारदारांचे म्हणणे आहे ते तपासणी केले असता दोषरहित आढळून आले. जेव्हा ग्राहकाच्या वीज पुरवठयाची स्थळ तपासणी केली तेव्हा विद्युतभार २१५२ वॅट इतका आढळून आला.वि. प. यांच्या म्हणण्यानुसार तक्रारदार यांना दिलेली उपरोक्त वीज देयके त्यांच्या प्रत्यक्ष वापरा प्रमाणे व मीटर रिडींग प्रमाणे बरोबर आहेत.

३) दिनांक ०६-०८-२०१६ रोजी तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे त्यांना दिलेला मार्च-२०१६ ते जून २०१६ ची वीज देयके जादा युनिटची असल्याने दुरुस्त करुन द्यावीत म्हणून गा-हाणे दाखल केले होते. सदर गा-हाणे सदर कक्षाने दि.०९-०९-२०१६ च्या आदेशाने नामंजूर केले. त्यामुळे तक्रारदार यांनी प्रस्तुत अपिल या मंचाकडे दाखल केले आहे.

४) सदर प्रकरणाचे सुनावणी मंचासमोर दिनांक ०८-११-२०१६ रोजी घेणेत आली . त्यावेळी तक्रारदार स्वतः उपस्थित होते . वि.प. तर्फे कार्यकारी अभियंता श्री ए.एम. शिन्दे हजर होते. उभयतांचे तोंडी निवेदन ऐकणेत आले. उपलब्ध दाखल कागदपत्रांचे वाचन करण्यात आले आहे.

५) या मंचाचे निर्णयासाठी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात.

(१) माहे मार्च-२०१६ पासून माहे जून २०१६ या कालावधीची तक्रारदार यांना दिलेली वीज देयके अवास्तव आणि अयोग्य आहेत काय?

उत्तरः- नाही.

(२) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## **<u>कारणमिमांसा</u>**

६) तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचे जुने वीज मिटर (क्र. ५८००८६००२६ ) हे सदोष होते व ते प्रत्यक्ष वापरापेक्षा जादा वीज वापर दर्शवित होते. सदर मिटर तक्रारदार यांच्या विनंती वरुन जून २०१६ मध्ये तपासणेत आले. मात्र त्यामध्ये दोष आढळला नाही.त्यातील दोषाचे (Error) प्रमाणे वजा ०-२९टक्के असल्याचे दिसून आले.

७) तक्रारदार यांच्या घरामध्ये २ टयूब लाईट , ५ पंखे, १ एअर कंडीशनर, धुलाई मशिन, २ पाण्याच्या मोटर्स, १ संगणक, १ टी.व्ही. व बल्ब वगैरे वीज उपकरणे वापरात होती. मार्च ते जून हा सर्व साधारणपणे कडक ऊन्हाळयाचा कालावधी असतो. वि.प. यांच्या म्हणण्याप्रमाणे तक्रारदार यांच्या घरामध्ये स्थळ तपासणीच्या वेळी २१५२ इतका विद्युतभार आढळून आला.

८) तक्रारदार यांचा वीज वापर एप्रिल २०१५ मध्ये २१९ युनिट जून २०१५ मध्ये ३३७ युनिट, ऑक्टोंबर २०१५ मध्ये २६२ युनिट, नोव्हेंबर २०१५ मध्ये ३६९ युनिट,आणि मे-२०१४ मध्ये ३५० युनिट अशा प्रकारे काही वेळा, वादग्रस्त कालावधी पूर्वीच्या काळात वीज वापर झालेला होता असे दिसून येते, त्याबाबत त्यांनी कधीही तक्रार केल्याचे दिसून येत नाही.

९) तक्रारदार यांचे वर परिच्छेद ६ मध्ये नमूद केलेले वीज मिटर दिनांक २२-०६-२०१६ रोजी अगर त्या सुमारास बदलून नविन वीज मिटर (क्र. ६५०७५५४११९) बसविणेत आले. जून २०१६ च्या शेवटी किंवा जुलै-२०१६ पासून कोल्हापूर जिल्हयात चांगल्या प्रमाणात पाऊस पडला होता. साधारणपणे ऊन्हाळयाच्या कालावधीत वीजेचा वापर ब-याच प्रमाणात वाढतो हे सर्वश्रुत आहे.

१०) तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, नविन वीज मिटर बसविल्यानंतर त्यांना मिळालेली वीज देयके बरोबर असल्यामुळे त्यांना वादग्रस्त कालावधीची वीज देयके दुरुस्त करुन द्यावीत.वीज बिलात नमूद केल्यानुसार तक्रारदार यांचा वीज वापर एप्रिल २०१६ मध्ये ६११ युनिट, मे२०१६ मध्ये ७३० युनिट, आणि जून २०१६ मध्ये ४२६ युनिट इतका होता. मंचासमोरील या प्रकरणात त्यांची तक्रार फक्त एप्रिल २०१६, मे-२०१६ आणि जून-२०१६ च्या वीज देयकांबाबत आहे. सदरच्या तीन महिन्यात त्यांचा वीज वापर , देयकाप्रमाणे एकूण १७६७ युनिट झाला होता. म्हणजे दरदिवशी त्यांनी साधारणपणे सरासरी २० युनिट वीज वापरली असे म्हणता येईल. तक्रारदार यांचे असेही म्हणणे आहे की, त्यांनी मिळालेल्या वीज देयकामधील २५ टक्के (रु. ४,३३०/-) भरले असून दिनांक १०-०६-२०१६ रोजी रु. ६,०००/- जमा केले होते.

११) वरील सर्व परिस्थितीचा सखोल विचार कला असता या अध्यक्षांचे असे मत झाले आहे की, एप्रिल २०१६ ते जून २०१६ या ऊन्हाळयाच्या कालावधीत तक्रारदार यांनी मोठया प्रमाणात वीज वापर केला असला पाहिजे. त्यावेळच्या वीज मिटरमध्ये कोणताही दोष आढळला नाही. तक्रारदार यांचा एअर कंडिशनर, पाण्याच्या मोटर किती क्षमतेच्या आहेत आणि त्यांचा वापर वादग्रस्त कालावधीत दररोज किती तास चालू होता याची खरी माहिती या न्यायासनामोर येत नाही. त्यामुळे त्यांचेकडून झालेला वीज वापर वरील काळात जादा प्रमाणात झाल्यामुळे त्यांना दिलेली वीज देयके अयोग्य व अवास्तव आहेत असे म्हणता येत नाही. सबब, तक्रारदार यांची मागणी स्विकार करता येत नाही. प्रस्तुतचा तक्रार अर्ज रद्द करणे शिवाय अन्य पर्याय नाही. तथापि तक्रारदार यांनी वीज देयके मिळाल्यानंतर प्रथम अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे आणि नंतर या मंचाकडे गा-हाणे दाखल केल्यामुळे त्यांचेकडून विलंब आकार, दंड व्याज वगैरे वसूल करु नये असा आदेश करणे योग्य होईल.

शेवटी खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येत आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांनी या मंचासमोर दाखल केलेली वीज देयकांबद्दलची तक्रार नामंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदार यांनी वादग्रस्त वीज देयकांमध्ये नमूद केलेल्या रक्कमेपैकी काही रक्कम भरली असल्यास ती वजा करुन ऊर्वरीत रक्कम त्यांनी समान चार हप्त्यामध्ये येणा-या चालू वीज देयका सोबत वि.प. यांचे कार्यालयात भरावी. तक्रारदार यांचे कडून मागील थकबाकी रक्कमेवर विलंब आकार व दंड व्याज वसूल करणेत येऊ नये.

३) तक्रारदार यांनी हप्ता/हप्ते मुदतीत भरले नाहीत तर वितरण कंपनीच्या नियमानुसार तक्रारदार यांना दंडव्याज भरावे लागेल.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |